● Date of Publication : गुरुवार, १२ एप्रिल २०१८, ● Posted at Market yard PSO Pune Daily. •••••• आर.एन.आय. MAHMAR/2005 रजि. नं. PCW/081/2018-2020/RNI No.14922

# ड्रायपोर्टसाठी निफाड कारखान्याची जागा घेण्याची जेएनपीटीची तयारी

**नाशिक (प्रतिनिधी) :** निफाड साखर कारखान्याची जागा १०५ कोटींना खरेदी करण्याची तयारी 'जेएनपीटी'ने दर्शविली आहे. ही जागा कर्जामुळे नाशिक जिल्हा बँकेकडे तारण असून, बँकेच्या संचालक मंडळाने या व्यवहाराला संमती दिल्यास निफाड तालुक्यात डायपोर्ट उभारणीचा मार्ग मोकळा होणार आहे.

शेतीमालाच्या जपणुकीसाठी निफाड तालुक्यात ड्रायपोर्ट उभारण्याचा राज्य सरकारचा मनोदय आहे. त्यासाठी निफाड तालुक्यात सरकारला जागेची आवश्यकता आहे. कर्जबाजारीपणामुळे बंद असलेल्या निफाड साखर कारखान्याकडे १०० ते १५० एकर जागा आहे. ही जागा घेण्यासाठी हालचाली गतिमान होऊ लागल्या आहेत; परंतु या कारखान्याकडून १०८ कोटी रुपयांची कर्जवसुली होणे बाकी असून, ही जागा जिल्हा बँकेकडे तारण आहे. कर्जवसुलीसाठी बँकेने तीन वेळा या जागेच्या लिलावाची प्रक्रिया राबविली. मात्र, एवढी रक्कम देऊन कारखान्याची जागा खरेदी करण्यास कुणी पुढे आलेले नाही. त्यामुळे या लिलाव प्रक्रियेला यश येऊ शकले नाही. जेएनपीटीलाही ड्रायपोर्टसाठी जागा हवी असल्याने त्यांनी १०५ कोटी रुपयांत ही जागा खरेदी करण्याची तयारी दर्शविली आहे; परंतु बँकेला १०८ कोटी रुपये येणे अपेक्षित असल्याने पेच निर्माण झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी बैठक बोलावण्यात आली. या वेळी जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी., निफाडचे प्रांताधिकारी महेश पाटील, जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र बकाल, भाजपचे ज्येष्ठ नेते सुरेश पाटील, डॉ. प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

ड्रायपोर्ट प्रकल्पासाठी ५०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, जेएनपीटीने १०५ कोटी रुपयांत कारखान्याची जागा खरेदीची तयारी दर्शविली आहे. या किमतीत जागा देण्यास कारखाना राजी असेल तर तसे पत्र जिल्हा बँकेला द्यावे, अशी सूचना या बैठकीत जिल्हा प्रशासनाने केली. या पत्रामधील प्रस्ताव मान्य अथवा अमान्य करण्याबाबत जिल्हा बँकेचे संचालक मंडळ निर्णय घेईल. १०८ ऐवजी १०५ कोटी रुपये स्वीकारण्यास जिल्हा बँक राजी असेल तर त्यांनी तसा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यावा. हा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून जेएनपीटीकडे पाठविला जाईल. त्यानंतर बँकेला पैसे अदा करून कारखान्याची जागा ड्रायपोर्टसाठी ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. तसे झाल्यास कारखाना कर्जमुक्त होणार असून ड्रायपोर्ट उभारणीचा मार्गही मोकळा होणार आहे.

# 'कोयना प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत कार्यवाही न झाल्यास आंदोलन'

**सातारा (प्रतिनिधी) :** ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत झालेल्या बैठकीत मांडण्यात आलेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत कार्यवाही न झाल्यास मुंबईतील आझाद मैदानावर तीव्र आंदोलन करू,'' असा इशारा श्रमिक मुक्ती दलाचे संस्थापक डॉ. भारत पाटणकर यांनी दिला.

मुंबईमध्ये पाटण, जावळी, महाबळेश्वर, कोरेगाव व कऱ्हाड तालुक्यांतील कोयना प्रकल्पग्रस्तांचा नुकताच मेळावा झाला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी हरिश्चंद्र दळवी, बाजीराव कदम, संदीप कदम, संजय कदम, राजू मोरे, अजय पाटील, शलाका पाटणकर, दत्ता देशमुख, चैतन्य दळवी, श्रीपती माने, विठ्ठल सपकाळ उपस्थित होते.

डॉ. पाटणकर म्हणाले, की माझ्यावर टीका करत बसण्यापेक्षा प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करा. पाटण तालुक्यातील कोणीही लोकप्रतिनिधींनी याचे श्रेय घ्यायचा प्रयत्न करू नये. प्रकल्पग्रस्तांच्या समस्या या ६४ वर्षे झाली, तरी सोडविल्या नाहीत आणि आता श्रेय घ्यायला जर कोण येत असेल, तर त्यांना त्यांची जागा दाखवून देऊ. ज्यांनी कोयना प्रकल्पग्रस्तांसाठी काहीही केले नाही. डॉ. पाटणकर प्रश्न सोडवत असतील, तर त्यात कुणाला वाईट वाटून घ्यायचे कारण नाही. पाटण तालुक्यातील ९३, जावळी-महाबळेश्वर मिळून १०५, कोरेगावाची पाच गावे कोयनेत येतात. २७ दिवस रात्रंदिवस आंदोलन स्थळावर उपस्थित राहिलेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांच्या विचारांचा हा लढा आहे. विजय प्रकल्पग्रस्तांचा आहे, मी फक्त निमित्त मात्र आहे. माझ्यावर टीका करणाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी काय केले, याचे उत्तर द्यावे. कोयना प्रकल्पग्रस्तांच्या २७ दिवसांच्या आंदोलनात एका पक्षाच्या कोयना विभागातील पदाधिकाऱ्यांनीच विरोध केला. ही बाब प्रकल्पग्रस्तांना वेदना देणारी आहे. निष्क्रियता लपविण्यासाठी कोयना प्रकल्पग्रस्तांच्या एकीत फूट पडण्याचा प्रयत्न काही लोक करत आहेत. तो त्यांनी बंद करावा, अन्यथा प्रकल्पग्रस्त जनता तुम्हाला गावात फिरू देणार नाही.''

सकाळ अॅग्रोवन आयोजित
FORTUNE PIPE — Quality & Service is our strength — प्रायोजित

अॅग्रोवन संवाद

'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

**शुक्रवार, १३ एप्रिल २०१८**

विषय - ऊस पीक व्यवस्थापन
वक्ते - श्री. सयाजी गायकवाड (ऊसतज्ज्ञ)
श्री. अभिजित गुंड (विभागीय व्यवस्थापक, फॉर्च्यून इंडस्ट्रीज)
स्थळ - सर्पनाथ मंदिर, सरफडोह,
ता. करमाळा, जि. सोलापूर
वेळ - सायं. ६ वाजता

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

अॅग्रोवन स्मार्ट अचिव्हर्स
१९ फेब्रुवारी ते २१ मे २०१८
प्रायोजक
PRITHVI academy
UPSC / MPSC
prithvi.net.in

**प्रश्न क्र. ५३**
**देशातील किती टक्के महाविद्यालये ग्रामीण भागात आहेत?**

**उत्तर: (कूपन) क्र. ५३**

☐ १) ३७.२२ टक्के ☐ २) ४८.१४ टक्के
☐ ३) ५९.३४ टक्के ☐ ४) ६७.१२ टक्के

# 'विमा कंपनीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा'

**परभणी (प्रतिनिधी):** खरीप हंगामातील पिकांचे १०० टक्के नुकसान झालेले असताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई नाकारणाऱ्या विमा कंपनीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी खासदार संजय जाधव यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे केली आहे.

कमी आणि अनियमित पावसामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे खरीप पीकविमा योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना पूर्ण जोखमीसह विमा परतावा मिळणे अपेक्षित असताना अत्यंत कमी नुकसान भरपाई दिलेली आहे. जिल्ह्यातील सर्वच मंडळांतील शेतकऱ्यांनी विमा रक्षण घेत असताना विविध पिकांसाठी हेक्टरी समान विमा हप्ता भरला आहे; परंतु विमा परतावा मंजूर करताना रिलायन्स विमा कंपनीने कमी परतावा मंजूर करून शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे. या प्रकरणाची चौकशी करून विमा कंपनीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी खासदार जाधव यांनी केली आहे.

